CNR NO. MHPU100002082012

| |
|---|
| **दिवाणी न्यायाधीश क. स्तर, पी.सी.एम.सी. न्यायालय, आकुर्डी, पुणे यांचे न्यायालयासमोर** |
| रे. दि. मु. नं. १२४/२०१२ सीएनआर नं.एमएचपीयु-१० ०००२०८-२०१२ |
| **श्री. सतीश एकनाथ नाणेकर व इतर** |
| वि. |
| **सदाशिव नानासाहेब नाणेकर व इतर** |

## निशाणी क्र.५५३ वरिल आदेश.
## (पारित दिनांक १५/०६/२०२६)

सदरचा अर्ज हा वादीने प्रतिवादी क्र. ८६ व ८७ यांच्याविरुध्द अनिवार्य हुकुम (Mandatory Injunction) मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. त्यावर प्रतिवादींचे म्हणणे मागवले. प्रतिवादी क्र. ८६ व ८७ यांनी निशाणी ५९२ वर त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे.

### वादीचे थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः

३. वादी असा युक्तीवाद करतात की, प्रतिवादी क्र. ८६ व ८७ वादी व इतर प्रतिवादीविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळण्याकरीता अर्ज (निशाणी क्र. ५३८)

दाखल केला होता. तो अर्ज दिनांक १६/१०/२०२५ रोजी न्यायालयाने नामंजुर केला. प्रतिवादी क्र. ८६ व ८७ यांचा जमीनीतील हिस्सा किती व कोणता आहे याचा अद्याप ठराव झालेला नाही, असे असताना देखील न्यायालयाने दिलेला आदेश न जुमानता वाद विषय असलेल्या जमीनीचा ताबा घेवून त्यामध्ये प्रतिवादी क्र. ८६ व ८७ यांनी त्यांचा नावाचा फलक व कंटेनर लावलेला आहे. त्यामुळे सदरहु अर्जाव्दारे वादींनी अशी प्रार्थना केली की, प्रतिवादी क्र. ८६ व ८७ यांनी वादविषय जमीनीत लावलेला फलक व कंटेनर हटविण्यात यावा, असा आदेश पारित करण्याची विनंती केलेली आहे.

**<u>प्रतिवादी क्र. ८६ व ८७ चे थोडक्यात कथन खालीलप्रमाणेः</u>**

४. प्रतिवादी क्र. ८६ व ८७ यांनी हजर होवून सदर अर्जास ठाम विरोध दर्शविला. अर्ज (निशाणी क्र.५३८) वरील आदेश पारित करताना जे निकष दिले ते निकष हे अंतीम होऊ शकत नाही. कारण त्या संदर्भात अजुन साक्षीपुरावा होणे बाकी आहे. प्रतिवादी क्र. ८६ व ८७ पुढे कळवितात की, निशाणी ५३८ वरील अर्जावर आदेश झाल्यानंतर प्रतिवादींनी दावा मिळकतीच्या काही भागाचा ताबा घेत आहेत, असे दाखविण्याचा प्रयत्न करतात. मात्र तशी परिस्थिती नसुन प्रतिवादी क्र. ९, १२ व ११ यांच्या संमतीने त्यांच्या हिश्याला येणा–या क्षेत्रापैकी १५ गुंठे इतक्या

मिळकतीचा प्रत्यक्ष ताबा प्रतिवादी क्र. ८६ व ८७ यांना दिलेला आहे. त्यामुळे तो ताबा कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे, हे पुरावा झाल्यानंतर ठरवता येणार आहे. इतकेच नाहीतर, दिनांक २५/०१/२०१९ रोजी मंडलधिकारी यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन साक्षीदारासमक्ष पंचनामा करुन तसा शासकीय अहवाल दिला आहे व तो न्यायालयात दिनांक २३/०२/२०२१ रोजी दाखल केलेला आहे. त्या अहवालामध्ये खरेदीदार यांच्या नावाचा लोखंडी बोर्ड लावल्याचे दिसुन येते, असा स्पष्ट उल्लेख केलेला आहे. त्यामुळे वादींचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली.

५. वादी व प्रतिवादी क्र. ८६ व ८७ तर्फे त्यांचे अधिवक्ता यांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा अर्ज निकाली काढण्यासाठी या न्यायालयासमोर खालील मुद्दे उपस्थित झाले व त्यावरील निष्कर्ष मी कारणांसह खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादी अनिवार्य हुकुम (Mandatory Injunction) मिळण्यास पात्र आहेत का ? | ....नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | ... अंतिम आदेशाप्रमाणे. |

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>मुद्दा क्र. १ करिता</u> –**

६. सदरचा दावा हा वाटपासाठी व निरंतर मनाई हूकूमसाठी दाखल केला आहे. सदरहु अर्जदार हे वादी यांनी अनिवार्य हुकुम (Mandatory Injunction) मिळावे, ही विनंती केलेली आहे. वास्तविकतः अनिवार्य हुकुम (Mandatory Injunction) हे गुणवत्तेवर म्हणजे दोन्ही बाजुंचा पुरावा ऐकल्यानंतर देण्यात येतो. वादी व प्रतिवादी यांनी कोणताही पुरावा न देता तसा अनिवार्य आदेश प्राप्त करता येत नाही. वादीचे असे कुठेही म्हणणे देखील नाही त्यांना तात्पुरता अनिवार्य आदेश म्हणजे (Temporary Mandatory Injunction) हवे आहे.

७. वादी असे कथन घेवून आलेले आहेत की, न्यायालयाने प्रतिवादी क्र.८६ व ८७ यांनी या अगोदर त्यांना तुर्तातुर्त मनाई हुकुम मिळावा म्हणून निशाणी क्र. ५३८ वर अर्ज दिलेला होता. तो अर्ज न्यायालयाने आदेश पारित करुन नामंजुर केला. परंतु, नजरचुकीने परिणामकारक आदेशामध्ये 'वादीचा अर्ज नामंजूर करण्यात येतो', असा मजकुर लिहिण्यात आला. त्यानंतर त्या आदेशामध्ये दुरुस्ती करण्यात आली. त्या अनावधानाने झालेल्या चुकीचा गैरफायदा घेवून बेकादेशीररित्या प्रतिवादी

क्र. ८६ व ८७ यांनी जमीनीचा ताबा घेवुन त्यांच्या नावाचे फलक व कंटेनर बसवलेले आहेत. ते आता हटविण्यात यावे, अशी मागणी केली आहे.

८. वादीच्या युक्तीवादानुसार निशाणी ५३८ कडील अर्ज नामंजुर झाल्यानंतर प्रतिवादी क्र. ८६ व ८७ यांनी वादीच्या जागेत त्यांच्या नावाचे फलक व कंटेनर बसवले. मात्र या कथनास प्रतिवादी क्र. ८६ व ८७ यांनी विरोध दर्शविला व असे कळवले की, त्यांनी निशाणी ५३८ अर्ज नामंजुर झाल्यानंतर बोर्ड बसवला नाही. उलट त्यांनी त्यांच्या हिश्यांची मिळकत ७.५ प्रत्येकी आर खरेदी केल्यानंतर बसविला. जेव्हा मंडलधिकारी यांनी प्रत्यक्ष वादीच्या जागेवरच येवुन गेले व त्यांनी अहवाल दिला. त्या अहवालामध्ये संबंधित मंडलधिकारी यांनी लोखंडी बोर्डचा उल्लेख केलेला आहे. जेव्हा मी सदरच्या अहवालाचे सुक्ष्मपणे अवलोकन केले तेव्हा त्यामध्ये खरेदीदाराच्या नावाचा बोर्ड म्हणजे प्रतिवादी क्र. ८६ व ८७ यांच्या नावाचा बोर्ड प्रत्यक्ष जागेतच दिसुन येत असल्याचे त्यांनी त्यांचा अहवाल दिनांक २५/०१/२०१९ मध्ये नोंद केलेली आहे. यावरुन असे प्रथमदर्शनी स्पष्ट होते की, प्रतिवादी क्र. ८६ व ८७ यांनी त्यांच्या नावाचा बोर्ड निशाणी ५३८ नामंजूर झाल्यानंतर बसविलेला नाही. तर तो सन २०१९ मध्ये जागेवरच असल्याचे दिसुन

येते. सदरहु, अर्जाव्दारे वादीने आणखी अशी मागणी केली की, वाद जागेवर कंटेनर बसविण्यात आले आहेत. ते काढण्यात यावे. त्याविषयी वास्तविकतः दिवाणी प्रक्रिया संहिता मध्ये जर एखादया तात्पुरत्या मनाई आदेशाचे उल्लंघन केले किंवा वादमिळकतीबद्दल न्यायालयाने अगोदरच काही आदेश पारित केले असल्यास त्याविरुध्द कोणतेही पक्ष वागले अथवा कार्यवाही केली तर त्याविषयची मागणी संबंधित पक्षकाराला वेगळे Miscellaneous Judicial Case (MJC) दाखल करुन दाद मागता येते.

९. प्रतिवादी क्र. ८६ व ८७ यांच्या ताब्याविषयी विचार केल्यास त्याची कारणे मी निशाणी ५३८ वरील आदेशामध्ये नमुद केलेली आहेत. तसेच, प्रथमदर्शनी सदरची खरेदीखते यांचे सुक्ष्मपणे अवलोकन केले असता त्यामधील खरेदी केलेले क्षेत्राचा विचार केला असता त्या खरेदीखताव्दारे महाराष्ट्र तुकडे बंदी अधिनियमाचा भंग होतो, असे स्पष्ट दिसुन येते. त्या विषयीचे सविस्तर विवेचन हे पुरावा झाल्यानंतर गुणवत्तेवर करण्यात येईल. आता सद्यस्थितीत वादीने जी मागणी केली आहे, ती मागणी मंजुर करणे योग्य होणार नाही. त्याकरीता वादीला वैकप्लीक पर्याय/दाद उपलब्ध आहे. म्हणुन मुद्दा क्र. १ चा निष्कर्ष नकारार्थी देण्यात येतो.

**<u>मुद्दा क्र. २ करिताः</u>**

१०. मुद्दा क्र. १ चा नकारार्थी निष्कर्षान्वये मुद्दा क्रमांक २ करीता खालील आदेश पारीत करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

१. वादीचा अर्ज निशाणी क्र.५५३ नामंजूर करण्यात येतो.

२. खर्च दाव्यात समाविष्ट करावा.

सही/-

आकुर्डी (विनोद संतोष डामरे)

दिनांक - १५/०६/२०२६ दिवाणी न्यायाधीश क. स्तर, आकुर्डी, पुणे.

**CERTIFICATE**

"I affirm that the contents of this P.D.F. file order are same word for word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Gaurav A. Bobade (Grade III) |
| Court Name | :- | Shri. V. S. Damare,<br>Civil Judge Junior Division, (P.C.M.C.),<br>Court, Akurdi, Pune. |
| Date | :- | 15/06/2026. |
| Order signed by<br>presiding officer on | :- | 15/06/2026. |
| Order uploaded on | :- | 15/06/2026. |